# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.५७६ दिनांक ०९.०७.२०२०

## चैन स्नॅचिंग करणा-या सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा,बोईसर युनीटला यश,

दिनांक ०९/०३/२०२० रोजी १०.३० वाजताचे सुमारास श्रीमती हेमलता हरीचंद्र पिंपळे वय ६० वर्षे रा. अमेया पार्क बोईसर या त्यांचे कोलवडे येथील कुलस्वामीनीचे दर्शन घेवून रिक्षाने घरी परत येत असतांना मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमाने त्यांचे गळयातील २० ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे मंगळसुत्र जबरी चोरी करुन पळून गेले होते. याबाबत बोईसर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ६८/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

स्थानिक गुन्हे शाखा,पालघर अंतर्गत बोईसर युनीटचे पोलीस उप निरीक्षक अभिजीत टेलर यांचे पथकाने घटनास्थळ परीसरातील माहीती घेवून समांतर तपास सुरु केला होता. मिळालेल्या गोपनीय माहीतीनुसार आरोपी १) राहुल ऊर्फ लंगडा रवी शर्मा, वय २७ वर्षे, रा. बोईसर ता.जि.पालघर २) जतिन ऊर्फ बंड्या भाऊ पोंटिंदे, वय २४ वर्षे, रा.टेंभोडा, ता.जि.पालघर यांना ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपुस केली असता त्यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना बोईसर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ६८/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२, ३४ या गुन्हयात अटक करुन पोलीस कोठडी रिमांड घेवून विचारपुस केली असता नमुद आरोपींनी १) डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ५३/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२,३४ हा देखील केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद आरोपींकडून बोईसर पोलीस ठाणे गुन्हयांत चोरीस गेलेला ४०,०००/- रुपये किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व डहाणू पोलीस ठाणे गुन्हयात चोरीस गेलेले ४५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याची चैन असा मुददेमाल हस्तगत करुन जप्त करण्यात आला असून आरोपींनी गुन्हा करण्यासाठी वापरलेली फॅशन प्रो मोटार सायकल हस्तगत करुन जप्त केली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र नाईक व सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली बोईसर युनीटचे पोउनि.अभिजीत टेलर, सहा.फौज.सुनील नलावडे, सहा.फौज.विनायक ताम्हाणे, सहा.फौज. भरत पाटील, पोलीस हवालदार संतोष निकाळे, दिपक राऊत, संदीप सुर्यवंशी, पोलीस नाईक /निरज शुक्ला, नरेंद्र पाटील यांचे पथकाने केली आहे.